# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## इराण संकटामुळे भारताच्या तिजोरीवर ताण; पंतप्रधान मोदींचे 'ते' आवाहन अत्यंत महत्त्वाचे-अर्थमंत्री निर्मला सीतारामन

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय चलन वाचवण्याबाबत आवाहन केले होते. पंतप्रधानांचे हे आवाहन ''अत्यंत महत्त्वाचे'' आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी सांगितले. कारण इराणमध्ये सध्या सुरू असलेल्या संकटामुळे भारताच्या आयात खर्चावर आणि पुरवठा साखळ्यांवर सातत्याने दबाव येत आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना सीतारामन म्हणाल्या की, कच्च्या तेलाच्या, खतांच्या आणि सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे भारतासमोर बाह्य आघाडीवर आव्हाने निर्माण होत आहेत, असे रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तात नमूद केले आहे. यावेळी त्यांनी असाही इशारा दिला की, या संघर्षामुळे इंधनाच्या किमती वाढू शकतात आणि मालवाहतुकीत विलंब होऊ शकतो. यामुळे व्यवसाय आणि ग्राहक या दोघांवरही याचा परिणाम होईल. जागतिक पातळीवरील वाढती अनिश्चितता आणि रुपयावर येत असलेला दबाव या पार्श्वभूमीवर, परकीय चलन वाचवण्यासाठी नागरिकांनी आणि उद्योगांनी मदत करावी, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले होते. त्यानंतर काही दिवसांनीच सीतारमन यांनी ही टिप्पणी केली आहे.


(वर्ष ६५ वे अंक १३७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२६ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# दहा दिवसांत पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत चौथ्यांदा भडका

### पेट्रोलच्या दरात २.६१, डिझेलच्या दरात २.१७ रुपयांची वाढ

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- सर्वत्र महागाईचा भडका उडाला असताना त्यात पुन्हा काहीशी भर घालणारी बातमी समोर आली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा दरवाढ झाली आहे. गेल्या दहा दिवसांत इंधनाच्या दरात दरवाढ होण्याची ही चौथी वेळ आहे. पेट्रोलच्या दरात २.६१ रुपयांनी आणि डिझेलच्या दरात २.१७ रुपयांनी वाढ झाली आहे. दिल्लीत डिझेलचा दर ९५.२० रुपये प्रति लिटर आणि पेट्रोलचा दर १०२.१२ रुपये प्रति लिटर झाला आहे. तर मुंबईत पेट्रोल २.७६ रूपये वाढले असून मुंबईत पेट्रोल १११.२१ रूपये प्रति लीटर, तर डीझेल २. ८१ रूपयांनी वाढून ९७.८३ रूपये प्रति लीटर इतके झाले आहे.

सर्वात महत्वाची बाब म्हणजे, गेल्या १० दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली ही चौथी दरवाढ आहे. पहिली दरवाढ १५ मे रोजी सुमारे ३ ने झाली. त्यानंतर १९ मे रोजी सुमारे ९० पैशांनी, पुन्हा २३ मे रोजी सुमारे ९० पैशांनी आणि आता, २५ मे रोजी पुन्हा एकदा लक्षणीय वाढ झाली आहे. एकूणच, गेल्या १० दिवसांत पेट्रोल प्रति लिटर ७.३५ ने आणि डिझेल प्रति लिटर ७.५३ ने महाग झाले आहे.

देशात शेतीचे दिवस ऐन तोंडावर आले असतांनाच सातत्याने पेट्रोल डिझेलचे दर वाढत चालले आहेत त्यामुळे तांत्रीक पद्धतीने शेती करतांना शेतकऱ्यांना या दरवाढीचा फटका बसणार आहे. याबरोबरच खरीपासाठी लागणाऱ्या बी-बीयाणे, रायासनिक खतांच्या किंमत वाढलेल्या राहणार असल्याने त्याचाही बोझा कोट्यावधी शेतकरी लोकांवर पडणार आहे. याबरोबरच पेट्रोल डिझेलच्या दरवाढीने सर्वच स्तरातील मालवाहतुकीचा खर्च वाढणार असल्याने त्याचा बोजा सर्वसामान्य लोकांवर होणार आहे. अर्थातच सर्वत्र महागाईचा आगडोंब उसळेल असे चित्र निर्माण होऊ लागले आहे.

## देशात कोरोनापेक्षा २० पट भयंकर परिस्थिती उद्‌भवणार

### इंधन दरवाढीवर विरोधकांचा घणाघात; मोदी जनतेला 'स्लो पॉईजन' देत असल्याचा दावा

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे केंद्राने सोमवारी पुन्हा एकदा पेट्रोल व डिझेल च्या किंमतीत अनुक्रमे २.७२ व २.८१ रुपयांची वाढ केली. गत १० दिवसांतील ही चौथी दरवाढ आहे. त्यामुळे महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना जबर झटका बसला आहे. विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत पंतप्रधान नरेंद्र मोदी या दरवाढीच्या माध्यमातून जनतेला स्लो पॉईजन देत असल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खा.सुप्रिया सुळे यांनी या दरवाढीवरून सरकारवर जोरदार हल्ला चढवला. या प्रकरणी त्यांनी दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, अटल बिहारी वाजपेयी व डॉक्टर मनमोहन सिंग यांची आठवण काढली.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही मोदींच्या धोरणामुळे देशात कोरोना काळापेक्षा २० पट वाईट परिस्थिती निर्माण होणार असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, सध्याची इंधन टंचाई कृत्रिम नाही. काल अमेरिकेने भारतावर आणखी एक निर्णय लादला. भारताने इराण व रशियाकडून तेल खरेदी करू नये. अमेरिकेचे तेल कितीही महाग असले तरी ते तेल भारताने खरेदी केले पाहिजे, असा फतवा अमेरिकेने काढला आहे. त्यामुळे ही टंचाई कृत्रिम नाही. ही टंचाई निर्माण होण्यास सरकार जबाबदार आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे पेट्रोल - डिझेल मिळत नाही. उद्या पेट्रोल १५० रुपयांवर जाईल आणि डिझेलही १४० रुपयांवर जाईल. पुढच्या महिन्याभरात ही परिस्थिती उद्धवेल.

फक्त एवढेच आहे की, एकाचवेळी वाढवायचे नाही, म्हणून एक-दोन रुपयांनी वाढ करणे सुरू आहे. भविष्यात ८ दिवसांनी दरात प्रत्येकी ५ रुपयांनी वाढ होताना दिसेल. हे लपून राहणार नाही. महाराष्ट्रातील शेतकरी उद्धवस्त होईल. कोरोनामध्ये जी परिस्थिती होती, त्याच्या २० पट परिस्थिती वाईट होईल. पूर्ण देश उद्धवस्त होईल. त्याचे कारण असे आहे की, एपस्टीन फाईल व अदानींचे प्रकरण यामुळे देश अमेरिकेच्या दावणीला बांधण्यात आला आहे.

ट्रम्प म्हणतात की, मोदींना फोन कुठे व करावा केव्हा करावा हे ठावूक आहे. ते योग्यवेळी मला फोन करतात. याचा अर्थ असा आहे की, भारताच्या पंतप्रधानांचा हात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दगडाखाली ठेवला आहे. तो काढता येत नाही. त्यामुळे ही परिस्थिती ओढावली आहे. परिस्थिती उद्या भयावह होणार आहे, असे वडेट्टीवार आज सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

विजय वडेट्टीवार आपल्या अन्य एका ट्विटद्वारे म्हणाले, ब्रेंट क्रूड आंतरराष्ट्रीय बाजारात ₹१०० च्या खाली घसरलंय, कच्चं तेल स्वस्त झालंय. पण भारतात मात्र पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडत आहेत! गेल्या १० दिवसांत इंधन दरवाढ तब्बल ७ रुपयाने झालीये. हा थेट सामान्य माणसाच्या खिशावर टाकलेला दरोडा नाही तर काय?

क्रोनोलॉजी समजून घ्या. जागतिक बाजारात क्रूड महागलं की लगेच सरकारला जागतिक संकट आठवतं, अर्थव्यवस्था धोक्यात आल्याचं रडगाणं सुरू होतं. जागतिक बाजारात क्रूड स्वस्त झालं की सरकार एकदम मौनात जातं, दरकपातीचा पत्ताच नसतो. दरवाढ करायची असेल तर ती एका रात्रीत, तात्काळ होते पण आंतरराष्ट्रीय बाजारात दर घसरल्यावर दरकपात मात्र कधीच होत नाही. हा डायनॅमिक प्रायसिंगचा खेळ फक्त जनतेला लुटण्यासाठीच सुरू आहे का?

देशातील जनता मूर्ख नाहीये. निवडणुका आल्या की पेट्रोलचे दर जैसे थे असतात आणि निवडणुका संपल्या की जनतेच्या खिशावर सर्जिकल स्ट्राईक सुरू होतो! म्हणजेच भाजपसाठी जनता ही फक्त मतदान करण्यापुरती आणि नंतर वसुली करण्यासाठी एटीएम मशीन ठरली आहे. मोदी सरकारने स्पष्ट उत्तर द्यावं. क्रूड स्वस्त झाल्यावरही भारतात पेट्रोल-डिझेल महाग का? जनतेच्या घामाचा पैसा नक्की कुठे जातोय? की काही मोजक्या उद्योगपती मित्रांच्या तिजोऱ्या भरण्यासाठी हा देश लुटला जातोय? असे ते म्हणालेत.

#### ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है-सुप्रिया सुळे

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, आम्हाला पेट्रोल डिझेल दरवाढीबाबत आश्चर्य वाटत नाही. आम्ही मागील ६ महिन्यांपासून बोलत आहोत. सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी सतत मागणी करत आहोत. पंतप्रधान परदेशात जाण्यापूर्वी आम्ही मागणी करत होतो, मात्र अद्याप बैठक लावलेली नाही. 'ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है'. देशाची आर्थिक परिस्थिती ढासळली आहे.

## देशातील पहिला 'पाण्याचा सातबारा' महाराष्ट्रात, महसूलमंत्री बावनकुळेंचा निर्णय

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी) पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरु करण्यात आले आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. यासाठी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाची तयारी सुरु केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत यावर सविस्तर चर्चा केली.

जलव्यवस्थापना करणाऱ्या ' अक्वेरियम 'या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, (पान ४ वर)

## राज्यात एकाच दिवशी चार भीषण अपघात; १८ जणांचा मृत्यू, ३२ जण जखमी

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात अपघातांच्या मालिकेने मोठी खळबळ उडाली आहे. राज्यातील विविध भागांत एकाच दिवशी चार भीषण अपघात घडल्याने किमान १८ जणांचा मृत्यू, तर अनेक जण जखमी झाले आहेत. रायगड, धुळे, जुन्नर आणि कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावर झालेल्या या दुर्घटनांमुळे राज्यभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. काही अपघातांमध्ये संपूर्ण कुटुंबे उद्धवस्त झाली असून, काही ठिकाणी निष्काळजीपणा आणि वेग हे कारण असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

रायगडच्या आंबेनळी घाटात रविवारी रात्री भीषण अपघात घडल्याची घटना समोर आली आहे. या घाटात एक स्कॉर्पिओ गाडी खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत आठ जणांचा जागेवरच मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार,





महाबळेश्वर ते पोलादपूर दरम्यानच्या मार्गातील आंबेनळी घाटाच्या परिसरात ही दुर्घटना घडली. स्कॉर्पिओ गाडी खोल दरीत कोसळल्यामुळे मृत प्रवाशांचे मृतदेह वर आणण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागत आहेत. आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलीस आणि इतर यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या आणि बचावकार्य सुरु झाले. बचाव पथकांना आतापर्यंत दोन मृतदेह शोधण्यात यश मिळाले आहे. ही स्कॉर्पिओ गाडी आंबेनळी घाटात जवळपास १००० फूट खोल दरीत कोसळली आहे. ही स्कॉर्पिओ गाडी साताऱ्यातील असल्याचे समजते.

अपघाताची माहिती (पान ४ वर)

## नीट पेपरफुटी प्रकरणी मनीषा हवालदारला ६ दिवसांची सीबीआय कोठडी

पुणे दि.२५ (प्रतिनिधी)- देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केलेली एनटीए पॅनेलवरील फिजिक्सची प्राध्यापिका मनीषा हवालदार हिच्या चौकशीतून अनेक धक्कादायक गुपिते उघड झाली आहेत. मनीषा हवालदारच्या पतीच्या मोबाईलमध्ये गॉड नावाने सेव्ह असलेला संशयास्पद क्रमांक हा तेजस शहा या विद्यार्थ्याचा असल्याची माहिती सीबीआयच्या फॉरेन्सिक तपासात समोर आली असून, यातून पेपरफुटीचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

मनीषा हवालदार यांना आज दिल्ली येथील सीबीआय न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुनावणी झाल्यानंतर मनीषा हवालदारला ६ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. आता सीबीआयच्या चौकशी या पेपरफुटी प्रकरणात आणखी काय माहिती समोर येते, ते पहावे लागणार आहे. दरम्यान, मनीषा हवालदारने तपास यंत्रणांच्या हाती काही लागू नये म्हणून कमालीची सावधगिरी बाळगली होती. तिने स्वतः तयार केलेल्या भौतिकशास्त्राच्या प्रश्नांच्या हस्तलिखित नोट्स चक्क जाळून खाक केल्या. तसेच, सहआरोपी आणि जीवशास्त्राची प्राध्यापिका मनीषा मांढरे हिच्याशी केलेले सर्व व्हॉट्सअॅप चॅट्स आणि मेसेजेस डिलीट करून डिजिटल पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, प्रश्नमालिका पाठवण्यासाठी तिने स्वतःच्या फोनसह पतीच्या मोबाईलचाही वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

## इंधनाच्या भडक्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर १९९१ सारख्या संकटाचे सावट? अर्थतज्ज्ञांचा मोठा इशारा

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- इराण-अमेरिका संघर्षामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी कच्च्या तेलाच्या किमती गगणाला भिडल्या आहेत. यामुळे सुमारे ८० टक्के इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला याचा मोठा फटका बसू लागला आहे. अशात, जर भारताला अधिक गंभीर आर्थिक संकटापासून वाचायचे असेल, तर खते आणि अन्न अनुदानांच्या व्यवस्थेत मोठे बदल करण्यासह, देशाने मोठ्या रचनात्मक सुधारणा हाती घेणे अत्यावश्यक आहे, असे कृषी अर्थतज्ज्ञ अशोक गुलाटी आणि वरिष्ठ संशोधिका रितिका जुनेजा यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'मधील एका लेखात म्हटले आहे.

या दोन्ही अर्थतज्ज्ञांनी असा इशारा दिला आहे की, जर सध्याचा दबाव कायम राहिला आणि भारतीय चलनाच्या (रुपयाच्या) संरक्षणासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागला, तर भारतीय रुपयाचे मूल्य घसरून ते अमेरिकन डॉलरच्या तुलनेत १०० रुपयांपर्यंत जाऊ शकते.

''अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे अवमूल्यन सुरूच आहे. जर रिझर्व्ह बँकेने निर्णायक हस्तक्षेप केला नाही, तर विनिमय दर घसरून १ अमेरिकन डॉलरमागे १०० रुपयांपर्यंत जाण्याची दाट शक्यता आहे'', असे त्यांनी लिहिले.

''जर होर्मुझची सामुद्रधुनी आणखी (पान ४ वर)

## महाराष्ट्रातील ८ मान्यवरांचा दिल्लीत सन्मान; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूच्याहस्ते पद्म पुरस्कार

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. आज पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला.

सहा दशकांहून अधिक काळ (पान ४ वर)

## भारताचा पाकिस्तानसोबतचा वाद पूर्णपणे वेगळा-मार्को रुबियो

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराणमधील युद्धात पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे. यावरून भारताने कोणतीही तक्रार किंवा आक्षेप घेतलेला नाही, अशी माहिती अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी दिली आहे. चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेल्या रुबियो यांनी स्पष्ट केले की, भारताची पाकिस्तानबाबतची चिंता ही प्रामुख्याने दहशतवादाशी संबंधित आहे.

मंगळवारी होणाऱ्या 'क्वाड' देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीपूर्वी पत्रकारांशी बोलताना रुबियो म्हणाले, ''पाकिस्तानी भूमीवरून भारताला लक्ष्य करणाऱ्या दहशतवादी संघटनांबद्दल भारताला नेहमीच चिंता असते. भारताने हा मुद्दा अनेकदा मांडला आहे. मात्र, अमेरिका-इराण संघर्षात पाकिस्तानने बजावलेल्या मध्यस्थीच्या भूमिकेवर भारताने कोणताही आक्षेप घेतलेला नाही. भारताचा पाकिस्तानसोबतचा वाद पूर्णपणे वेगळा आहे.''

पाकिस्तानच्या लष्करी नेतृत्वाशी अमेरिका पुन्हा जवळीक साधत असल्याच्या प्रश्नावर रुबियो यांनी सावध भूमिका घेतली. ते म्हणाले, ''जगातील इतर देशांशी आमचे व्यावहारिक पातळीवर संबंध आहेत, तसेच ते भारताचेही आहेत. पण आमचे इतर कोणत्याही देशासोबतचे संबंध हे भारतासोबतच्या धोरणात्मक भागीदारीच्या किमतीवर असू शकत नाहीत. हे सरकार पूर्ण होईपर्यंत भारत-अमेरिका संबंध इतिहासात सर्वाधिक मजबूत होतील.''

गेल्या काही काळापासून अमेरिका आणि इराणमधील वाद मिटवण्यासाठी पाकिस्तान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीमुळेच गेल्या सहा आठवड्यांपासून दोन्ही देशांमधील (पान ४ वर)

## पुण्यात उद्यापासून जमावबंदी; मोर्चे, आंदोलने, सभांवर कडक निर्बंध

पुणे दि.२५ (प्रतिनिधी)- पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीवरून विविध राजकीय व सामाजिक संघटना आक्रमक होत असताना आता पुणे प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उद्यापासून म्हणजे मंगळवारपासून पुढील १४ दिवस शहरात जमावबंदीचे आदेश जारी केलेत. या काळात शहरात कोणत्याही प्रकारचे मोर्चे, आंदोलने, मिरवणुका व सभा घेण्यास साफ मनाई करण्यात आली आहे.

पुणे पोलिसांनी सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७(१)(२)(३) अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. आगामी बकरी ईद व इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अलर्टही जारी करण्यात आला आहे.

दुसरीकडे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांनीही विविध विभागांकडून वाहनांचा होत असलेला अवाजवी वापर, अनावश्यक प्रवास व वाढता इंधन खर्च लक्षात घेता सर्व विभागप्रमुखांना इंधन बचतीबाबत तातडीचे आदेश दिलेत. महापालिकेच्या वाहनांचा वापर अत्यावश्यक कामांसाठीच करावा, प्रवासाचे योग्य नियोजन करावे, असे त्यांनी म्हटले आहे.

## सरकारचा इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या इंधन संकटामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून जगातील अनेक देशांनी पेट्रोल-डिझेल आणीबाणी घोषित केली आहे. काही देशांमध्ये तर दोन-दोन दिवसांचा लॉकडाऊन लावण्यात आला आहे. अशाही बिकट परिस्थितीत आपल्याकडे पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. भविष्यात इंधन मिळेल की नाही, या भीतीने नागरिकांकडून अचानक २० टक्के मागणी वाढली असून, कोणीही साठेबाजी करून यंत्रणेवर ताण आणू नये, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

मुंबईतील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन येथील नूतनीकृत इमारतीच्या लोकार्पण सोहळा आज पार पडला. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, शिक्षण मंत्री दादा भुसे आणि राज्यमंत्री पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सध्या जागतिक संकट आहे. अशा संकटात पुरवठा साखळी विस्कळीत झालेली असताना आणि जगात अनेक देशांनी पेट्रोल-डिझेल आणीबाणी घोषित केलेली आहे. काही ठिकाणी दोन-दोन दिवस लॉकडाउन आहे. अशाही परिस्थितीत आपल्याकडे आपण पेट्रोल-डिझेल देण्याचा प्रयत्न करत आहोत. काही ठिकाणी निश्चितपणे मोठ्या प्रमाणात लोक जमा झाले, त्यामुळे कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती तयार झालेली आहे. विशेषत: या सीझनमध्ये शेतकरी डबकीमध्ये डिझेलची मागणी करतात. साधारणपणे आपण ते देत नाहीत, पण या सीझनमध्ये शेतकऱ्यांना आपण देत असतो. शेतकऱ्यांच्या नावाने दुसऱ्यांनी साठेबाजी करू नये, या दृष्टीने जिल्हा प्रशासन प्रयत्न करत आहेत. त्याच्या वेगवेगळ्या उपाययोजना केलेल्या आहेत. (पान ४ वर)

## भोंदू अशोक खरातला ईडीकडून अटक

### १३.९२ कोटी रोख, मर्सिडीज कार, किलोभर दागिने जप्त

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- स्वतःला धर्मगुरू म्हणवून घेणाऱ्या आणि आध्यात्मिक उपचारांच्या बहाण्याने कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या नाशिकच्या अशोक कुमार एकनाथ खरात ऊर्फ कॅप्टन याला अंमलबजावणी संचालनालयाने मुंबईतून अटक केली आहे. ईडीच्या मुंबई आंचलिक कार्यालयाने मनी लॉन्ड्रिग आणि कथित खंडणी प्रकरणाच्या चौकशीनंतर ही मोठी कारवाई केली. आरोपी खरातला १९ मे २०२६ रोजी धन शोधन निवारण कायद्यांतर्गत अटक करण्यात आली असून, मुंबईच्या विशेष न्यायालयाने त्याला २६ मे २०२६ पर्यंत ७ दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. ही माहिती ईडीने आज त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून दिली आहे.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी अशोक खरात हा केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात गुंतलेला नव्हता, तर या पवित्र क्षेत्राच्या आडून तो एक अत्यंत पद्धतशीर (पान ४ वर)

# पाप आणि प्रायश्चित्ते

धर्मशास्त्र व पुराणात मनुष्यासाठी धर्माचरण व आचरणाचे नियम सांगितलेले आहेत. या नियमानुसार कर्म न करता अधर्मयुक्त कर्म करणे म्हणजे पाप होय. पापामुळे मनावर तसेच शरीरावर अत्यंत वाईट परिणाम होतात. पाप हे केवळ कृतीनेच नव्हे तर काया, वाचा व मनाच्याद्वारेही घडते.

याज्ञवल्क स्मृतीत पापांचे प्रकार सांगितलेले आहेत ते म्हणजे १) महापातक २) उपपातक आणि ३) लघुपातक महापातके ही गंभीर स्वरूपाची पातके असतात. यात ब्रह्महत्या, मदीरापान, सुवर्णचोरी, गुरू पत्नीगमन आदी प्रकारे येतात. उपपातके ही महापातकांपेक्षा थोडी कमी पण तरीही गंभीर स्वरूपाची पातके असतात. यात गोहत्या, देवद्रव्याची चोरी, गुरूचा अपमान, खोटी साक्ष देणे, ब्राह्मणाचा अपमान करणे, आदींचा समावेश होतो.

लघुपातके म्हणजे दैनंदिन जीवनात होणारी ही पापे असून यात खोटे बोलणे, क्रोध करणे, अपशब्द वापरणे, अशुद्ध आहार घेणे आदींचा समावेश होतो. पापामुळे मानवी जीवनावर विविध प्रकारे परिणाम होतात. सतत अस्वस्थ राहणे, ग्लानी येणे, अपराधीपणाची भावना वाटत राहणे, असे दृश्य परिणाम होत असतात. हे परिणाम दूर व्हावेत तसेच व्यक्तीची आत्मशुद्धी व्हावी यासाठी धर्मशास्त्रात काही प्रायश्चित्ते सांगितलेली आहेत.

महापातकापैकी ब्रह्महत्तेसाठी बारा वर्षे कठोर तप करणे, जंगलात जाऊन तप करून भिक्षा मागणे, सतत जप व प्रायश्चित्त व्रत याचा समावेश आहे. तर मदीरापान करणाऱ्यांसाठी कठोर उपवास, तपश्चर्या, तसेच गरम लाल तप्त झालेले दूध, मध किंवा गोमूत्र प्राशन करणे, तीर्थक्षेत्रांची यात्रा तसेच प्रायश्चित्त व्रत ही प्रायश्चित्ते सांगितलेली आहेत व हे गरम करण्यासाठी लोह ताम्र अथवा शिसेच्या पात्राचाच उपयोग करावा, तरच त्याची शुद्धी होते. अन्य कशानेही होत नाही. औषध म्हणून मद्य घ्यावे लागले, तर पुन्हा उपनयन करावे आणि दोनदा चांद्रयाण व्रत करावे. मदिरेचा स्पर्श झालेले पात्र सुद्धा अपवित्र मानले जाते. चंद्रग्रहणात भोजन केल्यास मदिराप्राशनाचेच पाप लागते, असा उल्लेख नारद पुराणात आहे. सुवर्ण चोरीसाठी चोरलेले द्रव्य परत देऊन बारा दिवस उपवास करावा, राजा अथवा समाजासमोर अपराध मान्य करणे व तप ही प्रायश्चित्ते सांगितली आहेत. रत्न, भूमी, स्त्री, मनुष्य यांचीही चोरी केल्यास सुवर्ण चोरीच्या प्रायश्चित्तासारखेच प्रायश्चित्त घ्यावे लागते. गुरूपत्नीशी समागम करणाऱ्यांसाठी कठोर तप, दीर्घकाळ ब्रह्मचर्य व्रत आणि काही काळासाठी सामाजिक बहिष्कार हे सांगितले आहे. महापातक्या बरोबर संबंध ठेवणाऱ्यांसाठीही उपवास जप, तप ही प्रायश्चित्ते सांगितली आहेत.

लघुपातकामधील अनवधानाने झालेल्या गोहत्तेसाठी गोदान करणे, उपवास, जप करणे, तसेच तीर्थक्षेत्रांची यात्रा करणे व पराकव्रत आदी प्रायश्चित्ते सांगितलेली आहेत. मुद्दाम केलेल्या गोहत्तेला प्रायश्चित्त नाही असे नारद पुराण सांगते. चोरी करणाऱ्यांच्यासाठी चोरलेले धन परत देणे, दंड भरणे व उपवास, व तप करणे ही प्रायश्चित्ते आहेत. खोटे बोलणाऱ्यांसाठी सत्य बोलण्याचे व्रत घेणे व उपवास ही प्रायश्चित्त आहेत. गुरूंचा अपमान करणाऱ्यांसाठी गुरूची क्षमायाचना करणे व त्यांची सेवा करणे ही प्रायश्चित्ते आहेत. व्यभिचारासाठी कठोर उपवास, तपश्चर्या व काही काळापुरता सामाजिक बहिष्कार सांगितलेला आहे. एखाद्याने काम वासनाने स्त्रीचा मानभंग केल्यास त्याला अग्निप्रवेश हेच प्रायश्चित्त नारद पुराणात सांगितले आहे. हिंसा म्हणजे निरपराध जीवाला मारणे या पातकासाठी कृच्छव्रत, दान, उपवास व तप सांगितलेले आहे. लाकूड, गवत, वृक्ष, गूळ, चामडी, वस्त्र व मांस चोरणाऱ्यांनी तीन दिवस उपवास करावा असे धर्मग्रंथात सांगितले आहे. याशिवाय प्रायश्चित्त प्रकारात अनेक प्रकारची व्रत वैकल्ये सांगितलेली आहेत. सामान्य कृच्छ व्रत : यात बारा दिवस उपास सांगितला आहे. त्यापैकी पहिले दिन दिवस एकदा अन्न घेणे, पुढचे तीन दिवस एकदाच रात्री अन्न घेणे त्यानंतरचे तीन दिवस न मागता मिळेल तेवढेच अन्न घेणे आणि पुढचे तीन दिवस पूर्ण उपवास असा क्रम आहे. अतिकृच्छ व्रत : हे अधिक कठोर उपास करणे आहे. बारा दिवसांपैकी पहिले तीन दिवस फक्त एक घास अन्न, पुढचे तीन दिवस रात्रीच एक घास अन्न, या पुढील तीन दिवस केवळ द्रव किंवा पाणी आणि शेवटी पूर्ण उपवास असा क्रम आहे.

हे सर्वात कठीण व्रत असून यात बाराही दिवसपूर्ण उपवास सांगितला आहे. काही परंपरेत अल्प प्रमाणात दूध अथवा पाण्याचे प्राशन चालू शकते. याशिवाय या काळात जप, देवपूजा मौनव्रत ब्रह्मचर्य, भूमी शयन व इंद्रिय संयम आदी नियमांचे पालन करावे लागते या व्रताचा उद्देश शरीराला कष्ट देणे नसून मनशुद्धी पापक्षालन पश्चाताप व आत्म नियंत्रण हा आहे.

चांद्रयाण व्रत : हे व्रत मोठ्या पापासाठी असून पौर्णिमेनंतर चंद्र ज्याप्रमाणे कलेकलेने कमी होत जातो त्याप्रमाणे अन्न कमी कमी करत जाणे व अमावस्येला उपवास करून पुन्हा चंद्र जसजसा पौर्णिमेसाठी वाढत जातो तसतसे अन्न हळूहळू वाढवणे याला चांद्रयाण व्रत असे म्हणतात. याशिवाय जप व होम आदीद्वारे ही प्रायश्चित्त घेता येते. यात वेदमंत्र, जप अग्नीहोत्र, देवपूजा, आदींचा समावेश आहे. अन्न व शुद्धीसाठी पवित्र स्नान, मंत्र, जप, पवित्र आहार हे उपाय आहेत. अपवित्रता दूर करण्यासाठी तीर्थयात्रा ब्राह्मण भोजन, दान, मंडपदान, आदी प्रायश्चित्त सांगितलेली आहेत.

पाराशर स्मृतीनुसार कलियुगात मनुष्य दुर्बल असल्याने कठोर तपश्चर्या शक्य नाही. त्यामुळे या युगात धर्म साधण्यासाठी व सर्वांना सोपा व करता येणारा उपाय म्हणजे नामस्मरण, दान, उपवास, तीर्थयात्रा, जप, आदी प्रायश्चित्ते सांगितलेली आहेत. ऋषीमुनींनी सांगितलेल्या प्रायश्चित्तांनी अथवा व्रताने जेवढी शुद्धी होत नाही तेवढी शुद्धी केवळ भगवंताच्या नामस्मरणाने व उच्चाराने होते, हे भागवतात अजामेळाच्या उदाहरणावरून सांगितले आहे. म्हणून पापक्षालनासाठी भगवंताचे नामस्मरण हाच एकमेव श्रेष्ठ उपाय आहे. महान पापी ही भगवद्भक्ती मुळे उत्तम पद प्राप्त करू शकतो. कलियुगातील प्रायश्चित्ते ही अन्य धर्मग्रंथाच्या तुलनेत अधिक सोपी व व्यवहार्य आहेत. प्रायश्चित्ताचा उद्देश मनुष्याने आपली चूक ओळखून पश्चाताप करावा व जप तपा द्वारे आत्मशुद्धी करून पुन्हा अशा प्रकारची चुकी न करण्याची खबरदारी घेणे हा आहे.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे. प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते. एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.



प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे. प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे. ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो. मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो. प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात. भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात. शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.

महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे. आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो. भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात. समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे 'वापरा आणि फेका' ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत. प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. लग्नसमारंभ, जत्रा, उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डिस्पोजेबल प्लेट्स, कप आणि पाण्याच्या बाटल्यांचा वापर होतो. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पत्रावळी, स्टीलची भांडी आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

पर्यटन क्षेत्रातही प्लास्टिक प्रदूषण मोठी समस्या बनली आहे. डोंगराळ भाग, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. पर्यटनस्थळांवर प्लास्टिक नेण्यावर निर्बंध आणणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि पर्यटकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. निसर्गरम्य स्थळांचे सौंदर्य टिकवण्यासाठी प्लास्टिकमुक्त पर्यटन ही काळाची गरज आहे. शेती आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होतो. प्लास्टिक कचऱ्यामुळे पाण्याचे स्रोत दूषित होतात. ग्रामीण भागात जैविक शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन प्लास्टिक वापर कमी करता येऊ शकतो. शेतकरी संघटना आणि कृषी विभागांनी या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

आज अनेक संशोधक प्लास्टिकला पर्याय शोधण्याचे काम करत आहेत. मका, ऊस, बटाटा स्टार्च आणि समुद्री वनस्पतींपासून जैवविघटनशील पदार्थ तयार केले जात आहेत. हे पदार्थ पर्यावरणात सहज विघटित होतात. तथापि, अशा पर्यायांचा खर्च अजूनही तुलनेने अधिक आहे. सरकारने संशोधनाला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक उद्योगांना मदत केली पाहिजे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या आणि टिकाऊ वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. त्यामुळे वारंवार नवीन वस्तू खरेदी करण्याची गरज राहत नाही. स्थानिक कारागीर आणि लघुउद्योगांनाही यामुळे रोजगार मिळू शकतो. निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परावलंबी आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी मानवाचेच नुकसान होय. पृथ्वीवरील संसाधने मर्यादित आहेत. आपण आज केलेल्या चुका भविष्यातील पिढ्यांना भोगाव्या लागू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे. प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे. आजच्या काळात मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. घरात आणि शाळेत पर्यावरणपूरक सवयी लावल्या पाहिजेत. मुलांनी स्वतः प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला तर भविष्यात समाजात मोठा बदल घडू शकतो. प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरण विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवता येते. यशस्वी उपक्रमांची उदाहरणे समाजासमोर मांडल्यास इतरांनाही प्रेरणा मिळते. अनेक गावांनी आणि शहरांनी प्लास्टिकमुक्त होण्याचा आदर्श निर्माण केला आहे. काही गावांमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कापडी पिशव्यांचा वापर सुरू केला आहे. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा प्रसार होणे गरजेचे आहे. आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे. आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. 'रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल' या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.

आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो. या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# सरदेसाई यांच्याकडील दुर्मिळ सांस्कृतिक ठेवा डिजीटाइज होणार?

केंद्र सरकारने 'ज्ञान भारतम् योजनेअंतर्गत दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्याचे काम हाती घेतले आहे. यासाठी विविध संस्थांना, मठांना, विद्यापीठांना तसेच खासगी संग्राहाकांना सहकार्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. खानापूरातील मराठी साहित्याचे जाणते अभ्यासक व म. ए. समितीचे दिवंगत नेते कै. उदयसिंग दत्ताजीराव सरदेसाई यांनी आपल्या आवडीतून गोळा केलेल्या त्यांच्या खासगी संग्रहामध्ये मराठी भाषेतील अत्यंत मौल्यवान व अनेक वर्षे जपलेली हस्तलिखिते सुस्थितीत असून त्यात ज्ञानेश्वरी, महाभारत तसेच अन्य धार्मिक व सांस्कृतिक ग्रंथांच्या प्रतींचा समावेश आहे. हा दुमिर्ळ ठेवा त्यांचे चिरंजीव श्री अभिजित सरदेसाई यांनी व्यवस्थित जतन करून ठेवला आहे. स्थानिक अभ्यासकांना लवकरच हा संग्रह प्रत्यक्ष पाहता येणार आहे.

विद्यापीठांनी, इतिहास संशोधन मंडळांनी, विविध संस्थांनी तसेच जाणकारांनी व अभ्यासकांनी कष्टाने मेहनतीने पिढ्यानब पिढ्या जपलेल्या अशा हस्तलिखित ग्रंथांमुळे साहित्य, धर्म, परंपरा आणि लोकभाषा असा सांस्कृतिक वारसा व त्याचे महत्व अधोरेखित होऊन जनमानसात टिकून रहिले आहे. इसवी सनाच्या सातव्या शतकात चीनी प्रवासी हुएनब त्संग या ज्ञानपिपासू बौद्ध भिक्कुने भारतातून साडे सहाशे हस्तलिखिते मायदेशी नेली आणि तेथे भारतीय भाषा, संस्कृती व तत्वज्ञानाची ओळख प्रसृत केली. नंतरच्या अनेक परकिय राजवटिंच्या काळात मौल्यवान असे ग्रंथ एकतर नष्ट झाले किंवा परदेशी नेले गेले. ते ग्रंथ आपल्याला दुर्मीळ झाले आणि भारतीय लोक त्यातील बहुमोल अशा माहितीला कायमचे मुकले, हि वस्तुस्थिती आहे. शिवाय नैसर्गिक आपत्तींमुळे देशभरात असंख्य दुर्लक्षित हस्तलिखिते कालौघात नष्ट झाली, गहाळ झाली.

आताशा केवळ धार्मिक संस्था, मठ, विद्यापीठे, वाचनालये, संग्रहालये किंवा खासगी संग्राहाकांकडे मात्र असे ग्रंथ आहेत. भविष्यात असे ग्रंथ, हस्तलिखिते पूर्णतः दुर्लभ होतील या जाणिवेमुळे त्यांचे संवर्धन होणे गरजेचे वाटते. इंग्लंड देशातील ब्रिटिश लायब्ररीने डिजिटायझेशनची मोहिम हाती घेऊन देशोदेशीचे कैक दुमिर्ळ ग्रंथ यापूर्वीच डिजिटाईज केले आहेत. यात भारतातील ग्रंथांचाही समावेश आहे. तसेच भारतातील अनेक विद्यापीठांनी आपल्याकडील ग्रंथ डिजिटाइज केले. उस्मानिया विद्यापीठ यात आघाडीवर होते. महाराष्ट्रात पुण्यातील भारत इतिहास संशोधन मंडळ व पुराभिलेखागारातील कागदपत्रे आता डिजिटाइज होत आहेत.

प्राचीन ग्रंथांचे संवर्धन व डिजिटायझेशनसाठी केंद्र सरकारच्या पुढाकारामुळे अशा ऐतिहासिक व धार्मिक वारशाच्या संरक्षणाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. या योजनेत ताम्रपट, भूर्जपत्र, ताडपत्र व कागदावर लिहिलेल्या हस्तलिखितांचा समावेश असणार आहे. 'ज्ञान भारतम' योजनेमुळे दुमिर्ळ हस्तलिखिते आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहतील, तसेच संशोधक, अभ्यासक आणि साहित्यप्रेमींनाही हे ग्रंथ सहज उपलब्ध होतील असे मत अभिजित सरदेसाई यांनी व्यक्त केले. त्यांनी आपल्याकडील ग्रंथांचे डिजिटायझेशनब व्हावे म्हणून संबंधित खात्याशी संपर्क केला आहे.

स्थानिक पातळीवर खानापूरातील बहुसंख्य लोकांना यापूर्वी सरदेसाई यांचेकडील संग्रहाबद्दल फारशी माहिती नसल्याने अनेकांना आता कुतूहल व कौतूक वाटत असून त्याबाबत अभिमान व्यक्त केला जात आहे. हा छोठासा ठेवा येथील सांस्कृतिक संपत्तीचा महत्त्वाचा भाग ठरणारा आहे, अशी प्रतिक्रिया जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे. खानापूरात इतरांकडेही असा संग्रह असण्याची शक्यता आहे. ज्या कुणाजवळ असा संग्रस आहे त्यांनी पुढे येऊन तो डिजिटायझेशनब करून ठेवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# सनातनच्या ग्रंथ-लघुग्रंथांच्या १ कोटीहून अधिक प्रती प्रकाशित!

'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले (गुरुदेव) यांच्यासारख्या थोर विभूतीच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेले सनातनचे ग्रंथ म्हणजे चैतन्यमय असे ज्ञानभांडार ! अनेक संत धर्म, अध्यात्म यांसंबंधी ग्रंथ लिहितात; पण धर्म, अध्यात्म यांच्यासह राष्ट्ररक्षण, हिंदु राष्ट्राची स्थापना, भाषाशुद्धी, सात्त्विक कला अशा विविधांगी विषयांवर ग्रंथ लिहिणारे सध्याच्या कलियुगातील सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले हे बहुधा एकमेवच संत असतील ! त्यांच्या अविश्रांत तळमळीमुळे एप्रिल २०२६ पर्यंत सनातनच्या ३७० ग्रंथ-लघुग्रंथांच्या १३ भाषांत १ कोटी २ लाख ६७ हजार प्रती प्रकाशित झाल्या आहेत. सनातनच्या ग्रंथांनी १ कोटीचा टप्पा पार करणे, ही सनातनच्या ग्रंथकार्यासाठी भूषणावह घटना आहे ! प्रकाशित प्रतींच्या या संख्येवरून 'समाजातील जिज्ञासूंना अध्यात्माची आणि शास्त्र समजून घेण्याची आवड किती आहे', हे लक्षात येते.

**गुरुदेवांचा वैद्यकीय लिखाणापासून आध्यात्मिक ग्रंथांपर्यंतचा प्रवास !**

गुरुदेवांनी आपल्या ग्रंथ लिखाणाचा श्रीगणेशा वैद्यकीय क्षेत्रापासून केला. त्यांचे बंधू डॉ. वसंत आठवले यांच्याकडून प्रेरणा घेत त्यांनी 'सायन्स ऑफ हिप्नोसिस' आणि 'हिप्नोथेरपी' यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. मात्र, काही काळानंतर त्यांच्या लक्षात आले की, भौतिक व्याधींवर उपचार करण्यापेक्षा 'अध्यात्मशास्त्र' श्रेष्ठ आहे. यातूनच १९८७ मध्ये त्यांनी 'अध्यात्म शास्त्र' हा पहिला ग्रंथ लिहिला. कालांतराने साधनेविषयी केवळ तात्त्विक माहिती न देता, 'साधना कशी करावी', या कृतीच्या स्तरावरील मार्गदर्शनावर त्यांनी भर दिला.

**'तू किताबों के उपर किताबे लिखेगा' हा गुरुआशीर्वाद !**

गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी दिलेला 'तू किताबों के उपर किताबे लिखेगा' हा आशीर्वाद शिरसावंद्य मानून त्यांनी ग्रंथलेखन केले. हे ग्रंथ लोखंडाचे सोने करणाऱ्या परिसाप्रमाणे आहेत; कारण या ग्रंथांतील शिकवण आचरणात आणल्याने अनेकांच्या जीवनात आमूलाग्र पालट झाले आहेत.

**अध्यात्मशास्त्राच्या इतिहासातील दुर्मिळ उदाहरण !**

इतर संतांप्रमाणे केवळ प्रवचने किंवा कीर्तने न करता गुरुदेवांनी ग्रंथलेखनाद्वारे समाजाला 'साधने'चा मार्ग दिला. याची प्रचिती म्हणजे १.५.२०२६ पर्यंत सनातन संस्थेचे १३४ साधक संत झाले आहेत, तर १०२५ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे. ग्रंथांचा अभ्यास करून इतक्या वेगाने संतनिर्मिती होणे, हे अध्यात्मशास्त्राच्या इतिहासातील दुर्मिळ उदाहरण आहे.

**सनातनच्या ग्रंथसंपदेची अद्वितीय वैशिष्ट्ये !**

१. केवळ अध्यात्मच नव्हे, तर आचारधर्म, बालसंस्कार, राष्ट्ररक्षण, सात्त्विक कला, आपत्कालीन उपचार आणि वाईट शक्तींपासून संरक्षण अशा विविध विषयांवर ही ग्रंथसंपदा उपलब्ध आहे.

२. क्लिष्ट शब्दांचा वापर न करता सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत हे ज्ञान मांडले आहे.

३. विशेष म्हणजे, व्याकरणाच्या दृष्टीने हे ग्रंथ अत्यंत शुद्ध आहेत. 'युनिव्हर्सल ऑरा स्कॅनर' या वैज्ञानिक उपकरणाद्वारे केलेल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे की, व्याकरणदृष्ट्या शुद्ध लिखाणात सकारात्मक ऊर्जा अधिक असते.

४. ग्रंथांमध्ये आजच्या विज्ञानवादी पिढीला पटेल अशा प्रकारे सारणी, टक्केवारी आणि वैज्ञानिक उपकरणांच्या आधारे अध्यात्मशास्त्र मांडले आहे.

५. ग्रंथांतील २० टक्के ज्ञान हे पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नाही. हे ज्ञान बुद्धीने न लिहिता ईश्वरी प्रेरणेने स्फुरलेले आहे.

**सनातन-निर्मित ग्रंथसंपदेचा भाषानिहाय विस्तार !**

हे दिव्य ज्ञान केवळ एका भाषेपुरते मर्यादित न राहता विविध प्रांतांतील जिज्ञासूंपर्यंत पोचावे, यासाठी सनातनने अहोरात्र प्रयत्न केले आहेत. मार्च २०२६ पर्यंत सनातनने १३ भाषांमध्ये आपले ज्ञानभांडार खुले केले आहे. यामध्ये सर्वाधिक ३४८ ग्रंथ मराठी भाषेत असून, त्यापाठोपाठ इंग्रजी भाषेत २०२, तर कन्नड आणि हिंदी भाषांत प्रत्येकी २०१ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यासोबतच गुजराती भाषेत ७०, तेलुगुमध्ये ५४, तमिळमध्ये ४९, बंगालीमध्ये ३०, मल्ल्याळम्मध्ये २५, ओडियामध्ये २२, पंजाबीमध्ये १३, नेपाळीमध्ये ३ आणि आसामी भाषेत २ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. अशा प्रकारे एकूण ३७० ग्रंथांच्या माध्यमातून अध्यात्माचा हा चैतन्यमय प्रवाह भारतभर प्रवाहित होत आहे.

**ग्रंथांचे मुख्य विषय !**

हिंदु धर्म : सण, उत्सव, १६ संस्कार आणि परंपरा.

आचारधर्म : आदर्श आहार, निद्रा, वेशभूषा आणि अलंकार.

साधना : नामजप, स्वभावदोष निर्मूलन, अहं-निर्मूलन आणि भावजागृती. आयुर्वेदीय उपचार, नामजप आणि प्रथमोपचार.

आपत्काळात मार्गदर्शक ठरणारे ग्रंथ !- पूर्वीच्या ऋषींनी वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आदींसारख्या धर्मग्रंथांद्वारे विपुल लिखाण करून ठेवले आहे. या धर्मग्रंथांतील सध्याच्या काळाला आवश्यक असे विषय आणि लिखाण सनातनच्या ग्रंथांमध्ये घेण्यात येतात. येणारा काळ आपत्काळाचा आहे. अशा वेळी हे ग्रंथच मार्गदर्शक ठरतील. प्रत्येकाने आपल्या घरी हे 'चैतन्यमय ग्रंथ' संग्रही ठेवून त्यानुसार आचरण करणे, हीच खरी गुरुसेवा ठरेल !

संकलक : श्री. चेतन राजहंस,
प्रवक्ता, सनातन संस्था

# कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'सिल्क स्कॅनर' ठरणार रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान

## ॲग्रो हॅकथॉन स्पर्धेत श्री दिलीप हाके यांचा गौरव



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - भारतातील सर्वात मोठ्या मानल्या जाणाऱ्या ॲग्रो हॅकथॉन स्पर्धेमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन सादर करून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणारे निवृत्त रेशीम उपसंचालक श्री दिलीप हाके यांना महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चषक, सन्मानपत्र आणि १५ लाख रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

श्री हाके यांनी विकसित केलेले ङ्गसिल्क स्कॅनरङ्घ हे अत्याधुनिक उपकरण भविष्यात रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठे वरदान ठरणार असल्याचे मत कृषी व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्पेक्ट्रोमिती संवेदक आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले हे उपकरण रेशीम कोषांची गुणवत्ता अचूकपणे तपासण्यास सक्षम आहे. सध्या बाजारपेठेत रेशीम कोषांची किंमत व्यापाऱ्यांकडून कोष हातात घेऊन अंदाजाच्या आधारे ठरवली जाते. त्यामुळे अनेकदा शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळत नाही. या पार्श्वभूमीवर विकसित करण्यात आलेले 'सिल्क स्कॅनर' हे यंत्र रेशीम कोषांचे वैज्ञानिक परीक्षण करून शेतकऱ्यांना पारदर्शक व योग्य दर मिळवून देण्यास मदत करणार आहे.

या यंत्राच्या सहाय्याने एका किलोमधील रेशीम कोषांची संख्या, कोषातील रेशमाचे प्रमाण, कोषांची गुणवत्ता, आकारमान तसेच इतर महत्त्वाचे मापदंड काही क्षणांत तपासता येणार आहेत. त्यामुळे रेशीम खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होणार आहे.

विशेष म्हणजे, या उपकरणामध्ये आवश्यक तांत्रिक बदल करून इतर विविध शेतमालाची गुणवत्ता तपासण्यासाठीही त्याचा उपयोग करता येणार असल्याचे श्री हाके यांनी सांगितले.

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. श्री दिलीप हाके यांच्या या अभिनव संशोधनामुळे महाराष्ट्रातील रेशीम उद्योगाला नवी दिशा मिळणार असून, कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# शहराचे आराध्य दैवत श्री. संकट मोचन हनुमान मूर्तीला १५१ किलो आबे अर्पण

वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - अधिक मासाचे पावित्र्य व शुभ महिना पाहता येथील शहराच्या मध्यभागी असलेले तसेच शहर व तालुक्यातील सर्व भक्त-भाविकांचे आराध्य दैवत असलेले श्री.संकट मोचन हनुमान मंदिरातील मूर्ती समोर अधिक मास (पुरुषोत्तम महिना)चे मांगल्य जाणत पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत १५१किलोचे आंबे सोमवार (ता.२५)रोजी मूर्तीला अर्पण करण्यात आले. सध्या या मंदिराचे अयोध्येच्या श्रीराम मंदिर समकक्ष बांधकाम चालू आहे.



अत्यंत विधिवत पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी यांनी हा विधी संपन्न केला. या प्रसंगी शहराचे जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, तसेच सुनील लाडवाणी व भक्त परिवार उपस्थित होता.

# अर्ध सत्य अधिक घातक असते !

समाजात वावरत असतांना अनेकदा अफवा,किंवा अर्ध सत्य सांगून बरीच मंडळी समाज मनात गोंधळ निर्माण करून त्या गोंधळलेल्या स्थितीचा फायदा घेत असतात. ही अफवा किंवा अर्ध सत्याचा गाजावाजा करणारी मंडळी विघातक व विध्वंसक वृत्तीची असतात.त्यांना असे करून नागरिकांची तारांबळ उडवुन गम्मत पहायची असते किंवा या अर्ध सत्यला पसरवून स्वतः चा स्वार्थ साधायचा असतो. यास्तव समाजातील सर्व थरातील मंडळींनी जो पर्यन्त

एखाद्या घटनेचे किंवा बातमीचे पूर्ण सत्य माहीत होत नाही पर्यंत शांत राहणे योग्य असते, कारण पूर्ण सत्या पेक्षा अर्ध सत्य खूपच घातक असते.जुन्या काळी जेष्ठ नागरिक एखादी घटना किंवा अफवा ऐकल्यावर असे म्हणायचे की'कानाचे व डोळ्यांचे अंतर चार बोटांचे आहे'म्हणजे ऐकण्यापेक्षा डोळ्यांनी खात्री करून मगच एखाद्या बातमी किंवा घटनेवर विश्वास ठेवणे योग्य.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# वीजचोरी करणाऱ्या ८ जणांवर गुन्हे दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - शहरातील विविध भागांत महावितरणने राबवलेल्या धडक मोहिमेत ८ जण वीजचोरी करताना आढळले. वीजचोरीची बिले भरण्यास टाळाटाळ केल्याने आरोपींवर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

महावितरणच्या मुकुंदवाडी शाखेचे सहायक अभियंता ज्ञानोबा राठोड व त्यांचे सहकारी वरिष्ठ तंत्रज्ञ दत्ता ढगे, तंत्रज्ञ अक्षय जावळे यांच्यासह इंदिरानगर मुकुंदवाडी येथे वीजमीटर तपासणी मोहीम ९ ते २० फेब्रुवारी २०२६ राबवली होती. त्या ठिकाणी काही नागरिक वीजचोरी करताना आढळले. यात राजू जनार्धन उदावंत यानपे ६ हजार ६९७, रामूगावलजी कुबेर याने २८ हजार २२०, सुंदराबाई महादू सुरासे हिने १५४३, मन्सूर फतरू पठाण याने ३८ हजार ५३, अर्चना ज्ञानेश्वर पवार हिने १८ हजार २१६, अनिता गोपाल राउत हिने ११४६, गोविंदराव कामजी सरपते याने २५ हजार २१४, युसुफ फतरू पठाण याने १२ हजार ५२० रुपयांची वीजचोरी केली.

या सर्वांनी एकूण १ लाख ४२ हजार ४७७ रुपयांची वीजचोरी केली. त्यांना २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. सर्व आरोपींनी महावितरणचे १ लाख ६७ हजार ४७७ रुपयांचे नुकसान केले. सहायक अभियंता ज्ञानोबा राठोड यांच्या फिर्यादीवरून आरोपींवर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सिल्लोड येथे आज (दि.२६) पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतिने मंगळवार दि.२६ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिल्लोड येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात मेटलमन ऑटो लि., यशश्री प्रेस कॉम्प्स प्रा.लि., नहार ग्रुप इंडिया, व्हेरॉक इंजिनिअर लि. वाळूज, अशा चार आस्थापनांकडून १८६ रिक्तपदे प्राप्त झालेली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत घेणार आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींना पात्रतेनुसार रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या चार प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदांसाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. पात्र व इच्छुक उमेदवारांनी मंगळवार दि.२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता उपस्थित राहून रोजगार संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सुरेश बहुरे यांनी केले आहे.

# 'वनार्टी'तर्फे मोफत प्रशिक्षण; ऑनलाईन अर्ज भरण्यास १५ जूनपर्यंत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेली वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (वनार्टी)तर्फे २०२६-२८ या शैक्षणिक सत्रासाठी जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास दि.१५ जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे,असे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी कळवले आहे. राज्यातील विमुक्त जाती तसेच भटक्या जमाती ब, क व ड नॉन-क्रिमीलेअर प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी वनार्टी ही संस्था कार्य करीत आहे.

सन २०२६-२८ या शैक्षणिक सत्रासाठी 'वनार्टी'तर्फे जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाणार आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांतील पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक विद्यार्थ्यांचे अर्ज 'वनार्टी'च्या www.vanarti.in या संकेतस्थळावर मागविण्यात आले आहेत. अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत ३० मे २०२६ निश्चित करण्यात आली होती. मात्र, विद्यार्थ्यांनी 'वनार्टी'च्या ७८८७८८२०२६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अर्ज प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या मोठ्या प्रतिसादाची दखल घेत आता अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे,असे कळिवण्यात आले आहे.

# महावितरणच्या मुख्य अभियंतापदी श्री. दीपक कुमठेकर रुजू

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी श्री.दीपक कुमठेकर सोमवारी (२५ मे) रुजू झाले. यापूर्वी ते नाशिक येथील महावितरणच्या नेटवर्क प्लॅनिंग सेलच्या मुख्य अभियंतापदी कार्यरत होते.



ते मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील रुकडी (ता. हातकणंगले) येथील रहिवासी आहेत. श्री.कुमठेकर यांनी सांगलीच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून विद्युत शाखेतील पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली. त्यानंतर विपणन व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. १९९९ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंतापदी ते रुजू झाले. श्री.कुमठेकर यांनी २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात कनिष्ठ अभियंता, सहायक अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता ते मुख्य अभियंता हा प्रवास थेट खात्याअंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होत पूर्ण केला आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात कोल्हापूर, सातारा, मुंबई, नाशिक, जळगाव, मुंबई या ठिकाणी काम केले आहे.

नुकतीच श्री.कुमठेकर यांची छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी बदली झाली. सोमवारी त्यांनी पदभार स्वीकारला. दरम्यान, श्री.पवनकुमार कछोट यांची नाशिक येथील नेटवर्क प्लॅनिंग सेलच्या मुख्य अभियंतापदी बदली झाली. महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री.आदित्य जीवने (भाप्रसे) यांच्या हस्ते श्री.पवनकुमार कछोट यांना पुष्पगुच्छ देऊन निरोप देण्यात आला, तर श्री.दीपक कुमठेकर यांचे स्वागत करण्यात आले.

# शांती नर्सिंग होम येथे 'स्किझोफ्रेनिया डे' साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) -कांचनवाडी, पैठण रोडवरील शांती नर्सिंग होम येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही 'जागतिक स्किझोफ्रेनिया सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहात रुग्ण व नातेवाईकांकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णाच्या वैद्यकीय उपचारानंतरही आजाराची काही लक्षणे जसे की, बौद्धीक क्षमता पूर्ववत न होणे, एकाग्रता कमी होणे, भावनांचा बोथटपणा, कमी होत नाहीत. रुग्णाचे आयुष्य पूर्व पदावर आणण्याकरिता स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णांचे पुनर्वसन करणे अत्यंत आवश्यक असते. शांती नर्सिंग होम येथे हे काम अनेक वर्षांपासून मोफत केले जात आहे.

या वर्षी स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त पुनर्वसन विभागातर्फे स्किझोफ्रेनिया आजार व उपचार तसेच पुनर्वसन या बद्दल शांती नर्सिंग होमच्या परिसरात विविध आरोग्य केंद्रांच्या ५० आशा वर्कर्सकरिता कार्यशाळा आयोजित केली होती. शांती नर्सिंग होम मधील मनोविकार तज्ञ व मानसोपचार तज्ञांनी मानसिक आजार समज गैरसमज, ताण-तणाव, व्यसनाधीनता, महिला व बाल मानसिक आरोग्य याबद्दल सहज व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर रुग्णांकरिता आठवडाभर ऑनलाइन ॲक्टीव्हिटीजब जसे की, चित्रकला, हस्तकला, पाककला, वृक्षारोपण, ब्रेन गेम्स इ. घेण्यात आल्या. स्किझोफ्रेनिया या आजाराबद्दल डॉ. निखिल खेडकर यांची आकाशवाणीतर्फे मुलाखत घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन शांती नर्सिंग होम येथील पुनर्वसन विभागाच्या समुपदेशक सौ. शितल सूर्यवंशी, सौ. प्रार्थना कुलकर्णी यांनी डॉ. विनय बान्हाळे व डॉ. विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता वैशाली दाभाडे, कुंदन शिंदे, सचिन आव्हाड, गणेश डोमाळे, रवींद्र शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले.

# 'उगाच खर्च नको, चित्रपट अधिक चांगला व्हायला हवा' - अल्लू अर्जुन यांच्या साध्या स्वभावाने जिंकली मनं!

लक्झरीपेक्षा चित्रपटांच्या गुणवत्तेला प्राधान्य देतात अल्लू अर्जुन, समोर आली खास गोष्ट.

एका बाजूला सुपरस्टार्सचं आयुष्य अनेकदा लक्झरी आणि आलिशान जीवनशैलीशी जोडून पाहिलं जातं, तर दुसऱ्या बाजूला अल्लू अर्जुन सध्या एका वेगळ्याच कारणामुळे लोकांचं लक्ष वेधून घेत आहेत. भारतीय सिनेमातील सर्वात मोठ्या स्टार्सपैकी एक असूनही त्यांचा साधेपणा आणि शिस्तबद्ध स्वभाव चाहत्यांना खूप आवडत आहे.

गेल्या काही आठवड्यांमध्ये अल्लू अर्जुन यांना अनेकदा हैदराबाद आणि मुंबईदरम्यान कमर्शियल फ्लाइटने प्रवास करताना पाहण्यात आलं आहे. पुष्पा २: द रूल च्या ऐतिहासिक यशानंतर आणि त्यांच्या मोठ्या प्रोजेक्ट्समुळे लोकांना ते चार्टर्ड फ्लाइटने प्रवास करतील अशी अपेक्षा होती, मात्र सूत्रांच्या माहितीनुसार



अभिनेत्याने स्वतः कमर्शियल फ्लाइटने प्रवास करण्यालाच पसंती दिली. निमर्त्यांकडून खासगी प्रवासाची व्यवस्था देण्याची ऑफर असूनही त्यांनी साधेपणाच निवडला. विशेष म्हणजे, सूत्रांच्या म्हणण्यानुसार अल्लू अर्जुन अनेकदा सोय आणि फ्लाइटची उपलब्धता लक्षात घेऊन प्रवास करतात. अनेक प्रसंगी त्यांनी लक्झरी व्यवस्थेपेक्षा इकॉनॉमी किंवा नियमित कमर्शियल सीटिंगलाही पसंती दिली, जे त्यांच्या जमिनीवर राहणाऱ्या स्वभावाचं उदाहरण मानलं जात आहे.

एका सूत्राने सांगितलं , त्यांच्या व्यस्त शेड्यूल आणि आरामाचा विचार करून निर्मात्यांनी अनेकदा चार्टर्ड फ्लाइटची व्यवस्था करण्याची तयारी दर्शवली होती.

पण अल्लू अर्जुन यांचं मत आहे की प्रोडक्शनचा पैसा पडद्यावर दिसला पाहिजे, पडद्यामागे विनाकारण खर्च होऊ नये. त्यांचं पूर्ण लक्ष नेहमी चित्रपटाची गुणवत्ता आणि सिनेमॅटिक आउटपुट अधिक चांगलं करण्यावर असतं, लक्झरीवर नाही.

अल्लू अर्जुन यांचा हा दृष्टिकोन आता प्रोडक्शन सर्कल्समध्येही चर्चेचा विषय बनत आहे. अशा काळात जिथे सुविधा सहज सवय बनतात, तिथे हा अभिनेता अजूनही बजेट आणि संसाधनांच्या योग्य वापराबाबत खूप जागरूक आहे, विशेषतः अशा मोठ्या प्रोजेक्ट्समध्ये ज्यांच्याशी लोकांच्या अपेक्षा खूप जोडलेल्या असतात.

सर्वात खास गोष्ट म्हणजे पुष्पा २: द रूल सारखी भारतीय सिनेमातील सर्वात मोठ्या ब्लॉकबस्टर्सपैकी एक फिल्म दिल्यानंतरही अल्लू अर्जुन यांनी स्वतःला एका सुरक्षित चौकटीत मर्यादित ठेवलेलं नाही. मग ती जबरदस्त शारीरिक तयारी असो, सतत स्वतःला नव्या अंदाजात सादर करणं असो किंवा Raka सारख्या आगामी प्रोजेक्ट्समध्ये प्रत्येक छोट्या गोष्टीकडे बारकाईने लक्ष देणं असो ते प्रत्येक वेळी स्वतःला आणखी पुढे नेण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज वाटप करावे-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी

## जनसमर्थ पोर्टलवर पीक कर्जासाठी ऑनलाईन नोंदणी करावी





छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- खरीप हंगामासाठी लागणाऱ्या पीक कर्ज शेतकऱ्यांना वेळेत वाटप करण्याची दक्षता सर्व बँक शाखानी घ्यावी, शेतकऱ्यांना कमी वेळेत पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जनसमर्थ पोर्टल वर नोंदणी साठी बँकांनी मदत करावी असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी यांनी केले. पिक विमा, आवास योजना, गाय गोठा अनुदान , लाडकी बहीण या योजनेच्या शासनाकडून आलेल्या अनुदानातून कर्जाची रक्कम कपात करू नये असे निर्देश जिल्ह्यातील सर्व बँक प्रतिनिधींना जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्याल यातील नियोजन सभागृहात जिल्हास्तरीय बँकर्स समिती सदस्यांची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेच्या अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, बँक ऑफ महाराष्ट्रचे उप अंचल प्रबंधक श्री जीवन पाटील,अमित मिश्रा आरबीआय मुंबई,जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषित मोघे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेचे समृत जाधव, जिल्हा उद्योग केंद्राच्या जिल्हा व्यवस्थापक करुणा खरात. सर्व शासकीय महामंडळाचे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत बँकांना प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करून वेळेत कर्ज वितरण करावे ,नामंजूर असलेल्या कर्ज प्रस्तावाच्या बाबतीत कारणासह विवरण स्पष्ट करणारे पत्र संबंधित विभागांना सादर करण्यात यावेत.जेणेकरून त्रुटीची पूर्तता करून याबाबत वेळेत प्रस्ताव निकाले लागतील व जास्तीत जास्त युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी याबाबतचा उपयोग होईल. बँकेमध्ये येणाऱ्या कोणत्याही योजनांच्या कर्ज प्रस्तावावर वेळेत निर्णय घ्यावा. त्रुटीची पूर्तता करून ते कालमर्यादित निर्णय घेणे आवश्यक आहे. असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या २०२६- २७ या आर्थिक वर्षाचा पतपुरवठा आराखडा पुस्तकाचे प्रकाशन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यात आर्थिक वर्ष २०२६- २७ साठी एकुण ४० हजार५०० कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे .कृषी क्षेत्रासाठी ६ हजार २००कोटी, मध्यम, लघु व सूक्ष्म उद्योगासाठी १२ हजार २००कोटी, प्राधान्य क्षेत्रासाठी २० हजार ५००कोटी तसेच अ अप्राधान्य क्षेत्रासाठी २० हजार कोटीच्या निधीची आराखडा करण्यात आलेला आहे.

जनसमर्थ पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी पीक कर्जासाठीची नोंदणी करावी ,जेणेकरून हे पोर्टल ॲग्रीस्टॅक नोंदणी असलेल्या शेतकरी यांच्या खात्याशी जोडले असल्याने इतर कागदपत्राची आवश्यकता असणार नाही, ही ऑनलाईन प्रक्रिया असल्यामुळे सुलभ आणि कमी वेळेत शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होण्यासाठी मदत होईल. तसेच जनसमर्थ या पोर्टलबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बँकांनाही पुढाकार घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले.

पीक कर्ज योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, विश्वकर्मा योजना, महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान, डिजिटल इंडिया, स्टॅन्ड अप इंडिया, शैक्षणिक कर्ज योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना. या योजनांच्या उद्दिष्ट पूर्ती बाबतचा आढावा जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषित मोघे यांनी सादर केला

पीक कर्ज तसेच बचत गट योजनेमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या बँक प्रतिनिधींना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.यामध्ये पंजाब नॅशनल बँक, इंडियन बँक, एचडीएफसी बँक, फेडरल बँक, आयसीआयसी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र,स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत एयु स्मॉल बँक, एचडीएफसी, आयसीआयसी आय , एसबीआय, आणि कोटक महिंद्रा बँकेच्या प्रतिनिधींचा जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# महानगरपालिका मुख्यालय व परिसर स्वच्छ ठेवून रिकामी जागांचा योग्य वापर करा; आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांनी आज सकाळी महानगरपालिका मुख्यालय परिसराची पाहणी करून मुख्यालय व परिसर स्वच्छ, नीटनेटका ठेवण्यासोबतच रिकामी पडलेल्या जागांचा योग्य नियोजनबद्ध वापर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आयुक्त अमोल येडगे यांनी महानगरपालिका मुख्यालय परिसर, साईड मार्जिन तसेच अंतर्गत मार्गांची पाहणी केली. यावेळी साईड मार्जिनमध्ये मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य, विटांचे तुकडे, फरशी तसेच उपयोगात नसलेल्या विविध वस्तू पडून असल्याचे निदर्शनास आले. या सर्व साहित्याची तातडीने विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच उपलब्ध जागेचा उपयुक्त वापर करण्यासाठी आवश्यकतेनुसार शेड उभारून दुचाकी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

महानगरपालिका मुख्यालय व परिसर स्वच्छ आणि शिस्तबद्ध ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, उपलब्ध जागांचा नागरिक व कर्मचारी यांच्या सोयीसाठी प्रभावी वापर व्हावा, यावर त्यांनी भर दिला.

याशिवाय आयुक्तांनी मुख्यालयातील लेखा विभाग तसेच उपायुक्त-१ कार्यालयाची पाहणी करून कार्यालयीन कामकाजाचा आढावा घेतला.

विविध विभागांतील कामकाज अधिक कार्यक्षम, सुव्यवस्थित आणि वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उप आयुक्त अपर्णा थेटे, शहर अभियंता संजय कोंबडे, सहाय्यक आयुक्त लता पुजारी आदींची उपस्थिती होती.

## जलशक्ती अभियान: पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्याची सज्जता करा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.




छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- येत्या पावसाळ्यात पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब हा जमिनीत जिरवून प्रत्येक पाणलोटक्षेत्रनिहाय विकास करावा, जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्याची सज्जता करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जलशक्ती अभियानाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषदेचे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, ग्रामिण पाणी पुरवठा उपअभियंता श्रीमती एम.जी. नांद्रे, सहा. पशु आयुक्त पशुसंवर्धन डॉ. आर.डी. इंगळे, उपजिल्हाधिकारी रोहयो रुपेश सिंगारे, जिल्हा दुग्धविकास अधिकारी मनिषा हराळ –मोरे, वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी यावेळी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेचाही आढावा घेतला. जल शक्ती अभियानांतर्गत पावसाचे पडणारे पाणी वाहून जाऊ देता कामा नये. पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवता आला पाहिजे यासाठी विविध जलोपचार करावे लागतील. त्यात लहान लहान समतल चर, शोष खड्डे, बंडिंग, भूमिगत रिचार्ज शाफ्ट, लहान लहान बंधारे, नाला खोलीकरण, विहीरींचे पुनर्भरण असए विविध उपक्रम राबविता येतील. या उपाययोजना विविध विभागांमार्फत राबविण्यात येत आहेत. त्यात जलयुक्त शिवार सारख्या अभियानातील कामांचाही समावेश आहे. त्या त्या भागातील पाणलोट क्षेत्रनिहाय पाणी अडवून ते ते क्षेत्र विकसीत करावे. पावसाचे पडणारे पाणी जमिनीत जिरवण्याचा निर्धार आपण केला पाहिजे. जलसंचय जन भागिदारी या उपक्रमाचा भाग म्हणून या प्रत्येक उपक्रमात नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे,असेही त्यांनी सांगितले.

## इंधन तुटवडा नाही म्हणणाऱ्या मंत्री महाजनांचे वक्तव्य निव्वळ 'शोबाजी'; अंबादास दानवे आक्रमक

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- 'राज्यात गेल्या तीन-चार महिन्यांपासून ग्रामीण भागात डिझेलचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांच्या लांबलचक रांगा लागत आहेत. असे असतानाही केंद्र आणि राज्य सरकार या गंभीर परिस्थितीकडे पूर्णपणे डोळेझाक करत आहे,' अशा कडक शब्दांत उद्धवसेनेचे नेते तथा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी सोमवारी (२५ मे) सरकारवर तीव्र हल्लाबोल केला. 'इंधन तुटवडा नसल्याचा दावा करणारे भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांचे वक्तव्य ही केवळ शोबाजी आहे,' असा टोलाही त्यांनी लगावला.

शहरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत अंबादास दानवे यांनी थेट जमिनीवरील वास्तव मांडले. ते म्हणाले, 'काळाबाजारामुळे आज सर्वसामान्य शेतकऱ्याला डिझेल मिळेनासे झाले आहे. मी स्वतः प्रत्यक्ष परिस्थिती पाहण्यासाठी तीन तास पेट्रोल पंपावर रांगेत उभा होतो. तिथे विना नंबरच्या वाहनाला नियमबाह्यपणे २५ हजार रुपयांचे डिझेल ब्लॅकने दिले जात आहे, मात्र ऐन खरिपाच्या तोंडावर शेतकऱ्याला रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. या काळाबाजारावर कारवाई करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार दोन्ही झोपले आहेत का?' असा संतप्त सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

## अवकाळी पावसाने वेरूळला झोडपले!; अर्धा तास चाललेल्या पावसामुळे लेणी परिसर जलमय, पर्यटकांची तारांबळ

वेरूळ/छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- वेरूळ व परिसरात आज दुपारी अचानक वातावरणात बदल होऊन अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास अचानक आलेल्या काळ्या ढगांसह विजांच्या कडकडाटाला सुरुवात झाली आणि पाठोपाठ सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. काही भागात गारपीटही झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

सुमारे अर्धा तास झालेल्या या पावसामुळे संपूर्ण वेरूळ परिसर जलमय झाला. अचानक आलेल्या पावसामुळे वेरूळ लेणी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेक पर्यटकांनी लेणीच्या व्हरांड्यात व सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला. गारपिटीमुळे लेणी परिसरातील वृक्षांच्या फांद्या तुटून पडल्या.

ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर झालेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. परिसरात काढणीला आलेली व गहू पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. फळबागांनाही गारपिटीचा फटका बसला आहे. 'ढगांच्या गडगडाटासह मोठ्या आकाराच्या गारा पडल्या. डाळिंब व मोसंबीच्या बागांचे नुकसान झाले,' असे एका स्थानिक शेतकऱ्याने सांगितले.

विजांच्या कडकडाटामुळे खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या. हवामान खात्याने पुढील २४ तासांत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांनी व पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणी थांबावे व झाडाखाली आसरा घेऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी शेतकऱ्यांसमोर मात्र नवे संकट उभे राहिले आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## देशातील पहिला...

मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाईल. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

## राज्यात एकाच दिवशी चार...

मिळताच रविवारी रात्री १० वाजल्यापासून महाबळेश्वर ट्रेकर्स आणि प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमकडून युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य सुरू असून पोलीस आणि प्रशासनही घटनास्थळी दाखल झाले. सध्या दोरीला स्ट्रेचर बांधून दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. हे मृतदेह घेऊन रुग्णवाहिका पोलादपूरमधील सरकारी रुग्णालयात गेली आहे. अपघातामधील मृत प्रवासी हे कोरेगाव तालुक्यातील आसगाव येथील रहिवासी असल्याचे समजते आहे.

प्राथमिक माहितीनुसार मृतांमध्ये महेश अनिल पवार (वय २५), आदित्य अशोक साळुंखे (वय २१), रितेश राजेंद्र लोखंडे (वय २५), सुहास जितेंद्र लोखंडे (वय २०), अंश समीर चव्हाण (वय १८), उत्कर्ष आनंद शिंगटे (वय २१), अनिल अभिमन्यू शिंगटे (वय २५) आणि नितीन किसन नायकोंडे (वय ३५) यांचा समावेश असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, रात्री १० वाजल्यापासून महाबळेश्वर ट्रेकर्स तसेच प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमकडून युद्धपातळीवर मदत व बचावकार्य सुरू असून पोलीस आणि प्रशासनही घटनास्थळी दाखल झाले आहे. दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**धुळ्यात लळिंग घाटात तिहेरी अपघात; ६ जणांचा मृत्यू**

धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावरील लळिंग घाटात पहाटेच्या सुमारास डंपर आणि ट्रकची धडक झाली होती. या अपघातानंतर मदतीसाठी थांबलेल्या टोल कर्मचाऱ्यांसह काहीजण घटनास्थळी होते.

मात्र त्याचवेळी एक भरधाव ट्रॅव्हल्स बस नियंत्रण सुटून थेट त्या वाहनांवर आणि तिथे उभ्या असलेल्या कर्मचाऱ्यांवर धडकली. या तिहेरी अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला, तर २६ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

**जुन्नरमध्ये एसटीची दुचाकीला धडक; चौघांचा मृत्यू**

अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील जुन्नर परिसरात एसटी बसने एका दुचाकीला जोरदार धडक दिली, ज्यात दुचाकीवरील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला. मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे.

**वारूळ येथे ट्रक-कारची धडक; ६ जण गंभीर**

कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील वारूळ येथे ट्रक आणि आर्टिगा कारमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात सातारा जिल्ह्यातील सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक ओव्हरटेक करत असताना हा अपघात घडला. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## इंधनाच्या भडक्यामुळे भारतीय...

तीन महिने बंद राहिली, तर जीडीपी वाढ ६ टक्क्यांपेक्षा कमी होईल आणि ग्राहक किंमत निर्देशांकातील महागाई ६ टक्क्यांपेक्षा जास्त वाढेल'', असे त्यांनी लिहिले आहे. तसेच, अशा परिस्थितीत आरबीआयकडे व्याजदर वाढवण्याशिवाय फारसा पर्याय उरणार नाही, असेही त्यांनी पुढे म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर, गुलाटी आणि जुनेजा यांनी असा युक्तिवाद केला की भारताला १९९१ मध्ये हाती घेतलेल्या सुधारणांसारख्याच सुधारणांची गरज आहे. ''अर्थव्यवस्था एका मोठ्या संकटाच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसते. हे टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे १९९१ प्रमाणेच मोठ्या सुधारणा करणे'', असे त्यांनी लिहिले.

या दोन्ही तज्ज्ञांनी नमूद केले की भारत आपल्या युरियाच्या गरजेपैकी २०-२५ टक्के युरिया आयात करतो आणि नवीन आयात निविदेनुसार प्रति टन आयात खर्च सुमारे ९३५ डॉलर असल्याचे दिसते. तरीही अनुदानामुळे शेतकऱ्यांना युरिया प्रति टन ७० डॉलरपेक्षा कमी दराने विकला जातो. ''याचे मूळ कारण म्हणजे युरियावरील प्रचंड अनुदान, जे आज त्याच्या खर्चाचा जवळपास ९० टक्के आहे'', असे त्यांनी लिहिले.

## महाराष्ट्रातील ८ मान्यवरांचा...

हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते. दोन मान्यवरांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदय कोटक यांचा समावेश आहे. त्यांनी एका छोट्या बिल डिस्काउंटिंग स्टार्टअपपासून देशातील अग्रगण्य खासगी बँक उभी करून भारतीय बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड निर्माण केले. कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि आर्थिक धोरण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले.

## भारताचा पाकिस्तानसोबतचा...

युद्धबंदी कायम आहे. या शांतता चर्चेला पुढे नेण्यासाठी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी नुकताच इराणचा दौराही केला आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही पाकिस्तानच्या या भूमिकेचे कौतुक केले होते. ''आम्ही केवळ पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ आणि फिल्ड मार्शल असीम मुनीर यांच्या आग्रहास्तव हा युद्धबंदीचा निर्णय घेतला आहे,'' असे ट्रम्प यांनी म्हटले होते.

## सरकारचा इंधन पुरवठा सुरळीत...

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपल्याकडे जेवढा कोटा मागील वर्षी होता. जवळपास तेवढाच कोटा आहे. पण भविष्यात पेट्रोल-डिझेल मिळेल की नाही, अशी भीती असल्याने २० टक्के मागणी वाढली आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, पुरवठ्यावर ताण येईल, अशाप्रकारे कुणीही साठेबाजी करू नये. परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न चाललेला आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत. काही ठराविक गावांमध्ये जास्त हिंसक पद्धतीची प्रवृत्ती दिसत आहे. तिथे पोलिसांना देखील सांगितले की, अशा प्रकारे हिंसा करणाऱ्यांवर केली पाहिजे.

## भोंदू अशोक खरातला...

आणि संघटित खंडणीचे रॅकेट चालवत होता. भोळ्याभाबड्या लोकांना आपल्या जाळ्यात ओढून, त्यांच्या मनात विविध भीती निर्माण करून तो त्यांच्याकडून कोट्यवधी रुपये उकळत असल्याचे तपासात उघड झाले आहे. या अवैध आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी ईडीने मागच्या एका महिन्यात आक्रमक पावले उचलली आहेत.

या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाने १३ आणि १४ एप्रिल, १७ एप्रिल, २३ एप्रिल, ५ मे आणि १८ मे २०२६ रोजी आरोपी अशोक खरात आणि त्याच्या निकटवर्तीयांच्या वेगवेगळ्या ठिकाणांवर एकापाठोपाठ एक धाडी टाकल्या. या प्रदीर्घ शोध मोहिमेमध्ये ईडीच्या हाती मोठे घबाड आणि महत्त्वाची कागदपत्रे लागली आहेत. छाप्यात तब्बल १३.९२ कोटी रुपयांची थेट रोकड आणि ५,५०० अमेरिकन डॉलर्स जप्त करण्यात आले आहेत.

सुमारे १.१२ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले असून, विविध बँकांमधील २.२५ कोटी रुपयांची रोकड फ्रीज (गोठवण्यात) करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या पैशातून खरेदी केलेली एक अत्यंत महागडी मर्सिडीज बेंज कार जप्त करण्यात आली असून अनेक बेनामी मालमत्तांचे रेकॉर्ड आणि डिजिटल उपकरणे ईडीने ताब्यात घेतली आहेत.

## गळाभेट घेण्याचा बहाणा करत शिवसेना उपजिल्हाप्रमुखावर जीवघेणा हल्ला, गुन्हा दाखल



छत्रपती संभाजीनगर दि. २५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरात शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास म्हस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बाबा पेट्रोलपंप चौक परिसरात गळाभेटीच्या बहाण्याने आरोपीने त्यांच्या गळ्यावर चाकूने वार केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

रविवारी रात्री उशिरा आरोपी राम बोडखे याने अंबादास म्हस्के यांना फोन करून भेटण्यासाठी बोलावले होते. त्यानंतर बाबा पेट्रोलपंप चौकात भेट झाल्यानंतर 'मजाक करत होतो' असे म्हणत आरोपीने गळाभेट घेत अचानक चाकूने गळ्यावर वार केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत म्हस्के यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, आरोपी राम बोडखे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

गंभीर जखमी अवस्थेत म्हस्के यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, आरोपी राम बोडखे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे,अशी माहिती पोलीस निरीक्षक सुनील माने यांनी दिली आहे.